I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल

(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): नांदेड    P.S. (पोलीस ठाणे): मुखेड    Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0137    Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 22/05/2026 17:29 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): मधले दिवस    Date from (दिनांक पासून): 26/02/2026    Date To (दिनांक पर्यंत): 21/05/2026

Time Period (कालावधी):    Time From (वेळेपासून): 15:20 तास    Time To (वेळेपर्यंत): 22:30 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):    Date (दिनांक): 22/05/2026    Time (वेळ): 17:18 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):    Entry No. (नोंद क्र.): 028    Date and Time (दिनांक आणि वेळ): 22/05/2026 17:18 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 5 कि.मी.    Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): होकर्णा रोड मूखेड ,मूखेड

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): सुरेश सोपानराव बनसोडे

(b) Father's Name (चे नाव ): सोपानराव बनसोडे

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1981

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांद, मूखेड , मुखेड, नांदेड, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांद, मूखेड , मुखेड, नादेड, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-9921771400

Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल राठोड | | | 1. Town/Village (शहर / गाव): माहित नाही,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मुखेड,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | चंपत शिंदे | | | 1. Town/Village (शहर / गाव): माहित नाही,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): मुखेड,District (जिल्हा): नांदेड,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाचेची रक्कम | 25,000.00 |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) : 25,000.00

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):

फिर्याद                                    दिनांक 22/05/2026

मी सुरेश सोपानराव बनसोडे, वय 45 वर्ष व्यवसाय नौकरी, पद पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड मोबाईल क्रमांक 9921771400

सरकारतर्फे फिर्यादी होवून फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे मागील 01 वर्षापासून कार्यरत आहे.

आम्ही दिनांक 25/02/2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे हजर असतांना

मा. पोलीस उप अधीक्षक श्री प्रशांत पवार यांनी आम्हास बोलावून कळविले की, तक्रारदार प्रशांत पवित्रे रा. कुंद्राळा, मुखेड यांची लाच मागणीची तक्रार आहे. आपण त्यांची तक्रारीची शहानिशा करून तक्रार नोंदवून पुढील योग्य ती कार्यवाही करावी असे आदेशीत केले. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना त्यांचे तक्रारी संबंधाने विचारणा करता त्यांनी कळविले की,

मौजे कुंद्राळा ता. मुखेड येथे माझे भाउ रावसाहेब याचे नावे गट क्र. 92 मध्ये 40 आर शेत जमीन आहे. सदर शेतीमध्ये माझ्या भावाचे नावे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजना अंर्तगत विहीर मंजूर झाली आहे. त्यावरुन माझे भावाचे शेतात विहीर खोदकाम झाले आहे. सदर विहीरीचे बिल काढण्यासाठी दिनांक 24/02/2026 रोजी पंचायत समिती मुखेड येथील अमोल राठोड, विस्तार अधिकारी (कृषी) हे शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी (कृषी) यांचेसह येवून विहीरीची पाहणी केली. त्यांनी मला सागितले की, तुझे भावाचे विहीरीचे बिल काढायचे असेल तर 25,000 रुपये लागतील असे सांगुन माझेकडे पैशाची मागणी करून आणुन देण्यास सागितले आहे.

त्यावरून मी तक्रार देण्यास आलो आहे. तेव्हा आम्ही तक्रारदार यांना तुमचा भाउ रावसाहेब यांचे बिलाचे काम प्रलंबित आहे, त्याची तक्रार घ्यावी लागेल असे सांगितले. तेव्हा तक्रारदार प्रशांत पवीत्रे यांनी कळविले की, भाउ भालकी कर्नाटक येथे उस तोडीसाठी आहे. उद्या त्याला तक्रार देण्यासाठी घेवून येतो असे म्हणाला. त्यावरून आम्ही त्यास कळविले की, तुम्ही उद्या मुखेड येथे तुमच्या भावासह थांबा आम्ही तेथे येवून तुमच्या भावाची तक्रार घेतो.

त्यानंतर आम्ही दिनांक 26/02/2026 रोजी श्री साईप्रकाश चन्ना, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड यांना लेखी पत्र देवून त्यांचेकडुन पंच क्र. 01 महेश चंद्रमोहन जोधळे यांना उपलब्ध करुन घेतले. तसेच मा. कार्याकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, उत्तर नांदेड ता. जि. नांदेड यांना पत्र देवुन पंच क्र. 02 हनमंत जयवंत दासरे यांना उपलब्ध करुन घेतले. सापळा पथक व दोन्ही शासकीय पंचाची एकमेकांना ओळख करून दिली. त्यानंतर आमच्या सुचनेवरून पोहेकॉ कणसे यांनी सापळा कार्यवाही करीता लागणारे सर्व आवश्यक साहित्य घेवून शासकीय वाहन क्रमांक एम.एच. 26 आर 342 ने मुखेड येथे सापळा कार्यवाही करीता ला.प्र.वि. कार्यालय नांदेड येथून रवाना झालो.

वेळ 13.30 वा. सुमारास आम्ही, दोन पंच व सापळा पथक असे मुखेड येथे होकर्णा शिवारात रोडजवळ पोहचलो. प्रवासा दरम्यान तक्रारदार प्रशांत पवित्रे यांना मुखेड येथील होकर्णा रोडवर येणे करीता सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे नमुद ठिकाणी त्यांचा भाउ रावसाहेब रमेश पवित्रे यांचेसह हजर आले. त्यानंतर आम्ही प्रशांत पवित्रे व त्यांचा भाउ रावसाहेब पवीत्रे यांची ओळख दोन्ही पंच व सापळा पथकाशी एकमेकांना करून दिली.

त्यानंतर तक्रारदार यांचा भाउ रावसाहेब पवीत्रे यांना स्वतः तक्रार देणेबाबत कळविले असता, त्यांनी सांगितले की, त्यांना तात्काळ ऊसतोडी कामाकरीता भालकी येथे जावयाचे असल्याने मी माझा भाउ प्रशांत यास अँन्टी करप्शनच्या येथे पुढील कार्यवाहीसाठी पाठविलेले होते. तरी त्याची तक्रार नोंदवून कारवाई करावी अशी विनंती केली. त्यामुळे आम्ही रावसाहेब पवीत्रे यांचे नमुद तक्रारी अनुषंगाने प्राधिकार पत्र पंचासमक्ष घेवून प्रशांत पवीत्रे यांची तक्रार नोंदविलेली आहे.

त्यानंतर तक्रारदार प्रशांत पवित्रे यांनी त्यांची लेखी तक्रार आमच्याकडे दिली ती पुढीलप्रमाणे आहे. तक्रारदार प्रशांत पवित्रे यांचा भाउ नामे रावसाहेब पवीत्रे यांचे नावे मौजे कुंद्राळा, ता. मुखेड येथे गटक्रमांक ९२ मध्ये ४० आर शेत जमिन आहे. तक्रारदार यांचे भावाचे शेतीचे पुर्ण व्यवहार हे तक्रारदार पाहतात. तक्रारदार यांचे भावाचे शेतीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वालंबन/विषेश घटक योजना अंतर्गत सिंचन विहीर मिळणेसाठी सन 2025 मध्ये ऑनलाईन फार्म केला होता. त्यानंतर विहीर खोदकाम करण्यासाठी मंजूरी मिळाल्याने त्यांचे भावाने विहीर खोदकाम सुरूवात केली. त्यानंतर सदर योजनेचा पहिला हप्ता 1,95,000/- रुपये रावसाहेब पवीत्रे यांचे बँक खात्यात जमा झाला आहे. विहीरीचे खोदकाम पुर्ण झाले असून विहीरीचे सिंमेटचे कडे टाकल्यावर दुसरा हप्ता 2,05,000/- रुपये येणे बाकी होता.

त्यासंबंधाने दिनांक 24/02/2026 रोजी तक्रारदार हे त्यांचे भावाचे शेतात विहीरीचे काम करीत असतांना पंचायत समिती मुखेड येथील अमोल राठोड (विस्तार अधिकारी कृषी) व त्यांचे सोबत सेवानिवृत्त (विस्तार अधिकारी कृषी) शिंदे हे विहीरीचे बांधकाम पाहण्यासाठी तेथे आले. विहीरीचे बांधकाम बघितल्यानंतर अमोल राठोड यांनी विहीरीचा दुसरा हप्ता बँकेत जमा करण्यासाठी 25,000/- रुपये दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी शिंदे यांनी सुध्दा या विहीरीचे मंजूरी माझे काळात झाली आहे. तुम्ही पैसे दिल्यास तुमचा दुसरा हप्ता अमोल राठोड ( विस्तार अधिकारी कृषी) हे जमा करतील असे त्यांनी सांगितले आहे. तेव्हा तक्रारदार यांनी नमुद पैसे कशाचे आहेत अशी विचारणा करता अमोल राठोड यांनी विहीरीचा बिलाचा दुसरा हफ्ता काढायचा असेल तर पैसे यावे लागतील असे म्हणाले. तक्रारदार यांना विहीरीचे खोदकामाचे दुसरा हप्ता जमा करण्यासाठी मागणी करीत असलेले 25,000/- हे लाच असल्याचे माहिती होती. परंतु विहीरीचे बिल काढायचे होते म्हणून तक्रारदार यांनी नाईलाजास्तव त्यांना होकार दिला आहे. त्याअनुषगांने त्यांनी सविस्तर स्वहस्ताक्षरात लेखी तक्रार नोंदवून घेतलेली आहे.

नमुद तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचानी स्वाक्ष-या केल्या. त्यानंतर आंम्ही तक्रारदार प्रशांत रमेश पवीत्रे यांना दोन्ही पंचा समक्ष लोकसेवक अमोल राठोड व शिंदे कुठे भेटतील या बाबत विचारपुस केली.

तेव्हा तक्रारदार यांनी लोकसेवक अमोल राठोड यांना फोन लावुन विचारपुस करतो असे म्हणाले. आमच्या सुचनेवरुन पोह/कणसे यांनी डिजिटल व्हाईस रेकार्डर 15.20 वाजता चालू करून तक्रारदार यांचे मोबाईल क्रमांक 7620501044 वरुन लोकसेवक अमोल राठोड विस्तार अधिकारी कृषी यांचे मोबाईल क्रमांक 9022459206 वर फोन केला असता त्यांनी फोन उचलला.

तेव्हा तक्रारदार प्रशांत पवीत्रे यांनी माझे भावाचे विहीरीचे बिलाचे काढायचे कस करायचे ते सांगा साहेब सगळेच थोड फार कमी जास्त झाल तर बर होतय असे म्हणाले असता, तेव्हा लोकसेवक अमोल राठोड यांनी सांगितले की, काय कमी जास्त आता काय बबा .... काल तर स्पष्ट बोलायचना

मग..... काल मग एवढ एवढ बोलल्या तुम्ही..........काय नाही तस काय भिती बाळगू नका.... ते काढतात तैन बिल.... जे हाय ते तैच काय ते करा.......आणि त्यानंतर तैन नाही तरी ए.डी.ओ. साहेबाला बोलतील, काढतील काढतो म्हणल्यावर... तुमच्यावर रागच असता तर तुमच्याइथ आलेच नसते ना शिंदे साहेब..... तेव्हा तिथेच हजर असलेले शिंदे (सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी) यांनी अमोल राठोड यांचेच फोनवरून तक्रारदार यांस बोलले की, हॅलो.... प्रशांत मी शिंदे बोलतो.. असे म्हणाले.

तेव्हा तक्रारदार प्रशांत पवीत्रे यांनी साहेब.... तुम्ही म्हणलेल कस करू...... किती देवू साहेब असे म्हणाले असता, शिंदे यांनी ते बोलेले तेव्हढे दया, तुमच काही नुसकान होवू देयना, असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार यांनी म्हणाले की, 25,000/- रुपये म्हणाले साहेब तुम्ही असे म्हणाले असता शिंदे रिटायर्ड विस्तार अधिकारी कृषी म्हणाले की, तेव्हढेच द्या..... काही कमी देवू नका, तुमच काही नुकसान होवू देईना असे म्हणाले.

त्यानंतर आम्ही नमुद संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये ऐकले असता वर नमुद प्रमाणे तक्रारदार यांचेकडे लोकसेवक अमोल राठोड, पदः विस्तार अधिकारी कृषी, नेमणूक पंचायत समिती मुखेड यांनी तक्रारदार यांचे भावाचे विहीरीचे कामाचे बिलाचा दुसरा हफ्ता मंजूर करणे करीता खासगी इसम चंपत शिंदे, पद - सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी यांचे मार्फतीने 25,000/- रूपयाची लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले आहे. त्यामूळे त्यांचे विरूध्द सापळा लावण्याचा निर्णय आम्ही सर्वानुमते घेतला आहे.

त्यानंतर तक्रारदार यांनी शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी यांना फोन करून म्हणाले की, 20000/- रूपयाचे काम झाले आहे साहेब, यायलो आहे असे म्हणाले असता त्यावर शिंदे म्हणाले की, तूम्हाला काय बिल कमी होते........... ते बगा ते 5 चं असे म्हणाले. त्यावर तक्रारदार 20च झाल उद्या 5 च करतो असे सांगितले.

त्यानंतर पुन्हा तक्रारदार यांनी शिंदे यांना फोनवर म्हणाले की, बोला की शिंदे साहेब......... त्यावर शिंदे म्हणाले की, इथ टोल नाका पास केलो मी......... तुम्ही सारंगी कड जा............. त्यावर तक्रारदार म्हणाले की, साहेब मोठी रक्कम आहे.... त्यांना कशी देवू............... तेव्हा शिंदे म्हणाले की, तूम्हाला काय राहिलंय.......... आणि मला उद्या फोटो टाका......... बरं का......... सकाळी मी बील करून ठेवतो...............................तसेच पंढरीकडं द्या........ तुम्हाला उद्या सकाळी देवू वाटलं तर द्या..............तुम्हाला भरोसा वाटलं त्यांचेकडे द्या असे म्हणाले.

दिनांक 27/02/2026 रोजी तक्रारदार यांनी शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी यांना फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा फोन लागत नसल्याने संपर्क झाला नाही. त्यानंतर पुन्हा त्यांचे मोबाईल क्रमांक वर व्हाॅट्सअॅप काॅल केला. त्यावर तक्रारदार म्हणाले की, तूमचा फोन लागत नाही, तेव्हा शिंदे म्हणाले की, गौलवाड यांना फोन लावून सांगतो. त्यांचेकडे पैसे दया असे म्हणाले. तेव्हा तक्रारदार याने पंढरी गौलवाड यांना फोन लागत नाही असे म्हणाले असता शिंदे यांनी सारंगी यांच्याकडे दया असे म्हणाले, तेव्हा तक्रारदार यांने शिंदे यांना तूम्हीच या साहेब कशाला दुस-याचे हातात दयायचे असे म्हणाले. तेव्हा ठिक आहे असे शिंदे म्हणाले

त्यानंतर फोनद्वारे तक्रारदार शिंदे यांना म्हणाले की, गौलवाड आले नाहीत. त्यावर शिंदे म्हणाले की, नाहीतर मग नारायण किंवा शरद यांचेकडे ठेवा किंवा सुरेश कुदरे यांचेकडे ठेवा. नाहीतर सारंगी

वाल्याकडे ठेवा, असे म्हणाले. त्यावर तक्रारदार यांनी मला त्यांचेवर विश्वास नाही, असे म्हणाले असता शिंदे यांनी म्हणाले की, बघा बाबा.......... तुमच्या मनावर, असे म्हणाले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यास सारंगी झेरॉक्स वाल्याकडे किंवा वरील लोकांकडे लाच रक्कम घेवून जावे असे म्हणालो असता तक्रारदार यांनी आम्हास सागितले की, वरील सर्व लोक माझे नातेवाईक व गावातील शेजारी, मित्राचे वडील आहेत. त्यामुळे मी माझे गावातील व ओळखीच्या लोकांना लाचेची रक्कम देणे मला योग्य वाटत नाही. मला माझे गावातील लोकांवर कार्यवाही करण्याची इच्छा नाही. तसेच मला दोन दिवस माझ्या भावाला उसतोडीसाठी भालकी कर्नाटक येथे सोडण्यासाठी जाणे आहे. त्यामुळे दोन-तिन दिवसानी शिंदे यांना फोन करुन पैसे देण्याचा प्रयत्न करुया, त्यांनी पैसे घेण्यास नकार दिल्यास पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी असे सांगितले त्यामुळे दिनांक 27/02/2026 रोजीची कार्यवाही तात्पुरती स्थगीत करण्यात आली आहे.

दिनांक 04/03/2026 रोजी आम्हास माहिती मिळाली की, शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी हे पंचायत समिती मुखेड येथे हजर आहेत. त्यामुळे आम्ही आज रोजी मुखेड येथे सापळा पथक व दोन पंचासह हजर आलो. त्यांनतर मौजे चिवळी रोड, मुखेड येथे तक्रारदार यांची भेट घेतली. त्यानंतर सापाळा पुर्व व सापळा कार्यवाहीस सुरुवात करून तक्रारदार यांनी हजर केलेली लाच रक्कम 20,000/- रुपये (ज्यात पाचशे रुपये दराच्या 40 भारतीय चलनी नोटा) हजर केल्याने नमुद नोटांचा अँथ्रासीन पावडर लावण्यात आले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांना योग्य त्या सुचना देवून शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी यांची सापळा कार्यवाही करीता भेट घेण्यासाठी पंचायत समिती मुखेड येथे रवाना केले.

त्यावरून तक्रारदार व पंच क्रमांक 1 हे शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी यांची भेट पंचायत समिती मुखेड येथे घेतली असता त्यांनी नमुद लाच रक्कम मुखेड येथील सारंगी झेरॉक्स येथे नेवून द्या असे तक्रारदारास सांगितले.

त्यानंतर आमच्या सुचने वरून तक्रारदार व पंच क्रमांक 1 असे दोघेजण शिंदे यांनी सांगितल्या प्रमाणे मुखेड येथील सारंगी झेरॉक्स यांचेकडे जावून त्यांना लाचेची रक्कम देण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी नमुद तक्रारदारस कळविले की, तुम्ही शिंदे साहेबांचा बॅक खाते क्रमांक द्या मी त्यांचे बॅक खात्यावर नमुद रक्कम पाठवितो असे म्हणून रक्कम स्वीकारण्यास नकार दिला आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदाराचे संपर्कात राहून लाच स्वीकृती सापळा आजमिवण्याबाबत विचारणा केली असता त्यांनी कळविले की, शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी हे देवदर्शनासाठी तिरूपती येथे गेलेले आहे. तसेच माझे वडीलांची प्रकृती खराब आहे असे सांगितले. त्यामुळे त्या दरम्यानच्या काळात सापळा कार्यवाही करता आलेली नाही.

तसेच पुन्हा तक्रारदार यांस लाच स्वीकृतीचा सापळा कार्यवाही आजमविण्याबाबत विचारणा केली त्यावरून दिनांक 20/05/2026 व दिनांक 21/05/2025 रोजी तक्रारदार यांनी लाच रक्कम देण्यासाठी शिंदे सेवानिवृत्त विस्तार अधिकारी यांचे मोबाईल क्रमांकवर फोन केला असता फोनवर संपर्क झाला नाही.

एकंदरीत सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी शिंदे यांना वेळोवेळी संपर्क केला असता त्यांचा फोन बंद येत आहे तसेच ते तक्रारदाराशी संपर्क करत नाहीत. यावरून त्यांना तक्रारदारावर संशय आल्याने ते लाचेची रक्कम तक्रारदाराकडून स्वीकारणार नाही तसेच त्यासंबधाने संपर्क करणार नाही

अशी तक्रारदार यांची खात्री झाली आहे. त्यामुळे पुढील योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी असे तक्रारदार यांनी आम्हा, सापळा पथक तसेच दोन्ही पंचासमक्ष सांगितले.

सदर सापळा कार्यवाहीतील लोकसेवक अमोल राठोड, पद: विस्तार अधिकारी कृषी, नेमणूक पंचायत समिती मुखेड यांनी तक्रारदार यांचे भावाचे विहीरीचे कामाचे बिलाचा दुसरा हफ्ता मंजूर करणे करीता खासगी इसम चंपत शिंदे, पद - सेवानिवृत्त विस्तार अधिकारी कृषी यांचे मार्फतीने 25,000/- रूपयाची मागणी केली. तसेच खासगी इसम चंपत शिंदे यांनी तक्रारदार यांचेकडे वारंवार लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वतः व इतरा मार्फत मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे निशपन्न झाले आहे. म्हणून माझी वरील दोन्ही आरोपीता विरूध्द कलम 7, 7अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

फिर्याद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** LAXMAN VYANKATRAO KENDRE (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Registered by (नोंदणी अधिकारी)

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): LAXMAN VYANKATRAO KENDRE

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.): API

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):